नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
*तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉलसमोर, पुणे-1*
*दुरध्वनी क्र. 020-26123826 फॅक्स क्र. 020-26129949*
ईमेल-आयडी*do4.igro@igrmaharashtra.gov.in*

क्र.का.4/प्र.क्र.737/2024 /1719 दिनांक - 29 /07/2024

**विषय :** ऑनलाईन प्लॅटफार्म व्दारे सादर केलेल्या अर्जांवर मुदतीत कार्यवाही / निपटारा करणे याबाबत सिस्टीम डॅश बोर्डव्दारे अनिवार्य उत्तरदायित्व निश्चितीबाबत.

## परिपत्रक

नोंदणी आणि मुद्रांक विभाग, महाराष्ट्र शासनाच्या व्यवसाय सुलभतेच्या (EoDB) कार्यक्रमात सक्रिय सहभागी आहे.

EoDB चा एक भाग म्हणून, नोंदणी आणि मुद्रांक विभागाने राज्यात महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत आणि विभागाव्दारे प्रदान करण्यात येत असलेल्या विविध सेवा ऑनलाइन पद्धतीने पुरविण्यात येत आहेत.

EoDB अंतर्गत, नोंदणी आणि मुद्रांक विभागाने आपल्या सेवांच्या ऑनलाइन सुविधेसाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्मची संकल्पना प्रत्यक्ष अस्तित्वात आणून जलद व निर्धारित वेळेत सेवा देणेची अंमलबजावणी केली आहे.

याव्दारे विभागाने शासन ते नागरिक (G2C) तसेच शासन ते व्यवसाय (G2B) या सेवावितरण प्रणालीमध्ये पारदर्शकता, सुलभता, वापरकर्ता अनुकुलता, विभागांतर्गत कार्यक्षमता व नागरीक व व्यवसाय याप्रती शासनाचे उत्तरदायित्व यासाठी नोंदणी व मुद्रांक विभागामध्ये, सर्व ऑनलाईन प्लॅटफार्म व्दारे सादर केलेले दस्तऐवज नोंदणी / व्यवहाराचे दस्त इ. बाबतचे सर्व अर्ज डॅशबोर्डवर मॉनिटर केले जातील. व त्याव्दारे सादर होणाऱ्या प्रत्येक अर्जाबाबत त्यावर कार्यवाही पूर्ण करण्यासाठी लागणारा निर्धारित कालावधी, आवश्यक सेवा शुल्क, प्राप्त अर्ज, मंजूर केलेले अर्ज त्याबाबत लिंग-विभक्त डेटा, एखादया अर्जावर कार्यवाहीसाठी लागलेला जास्तीत जास्त कालावधी, अर्ज निपटारा करण्यासाठी लागलेला कमीत कमी कालावधी, निपटारा करण्यासाठी लागलेला सरासरी कालावधी, मध्यवर्ती कालावधी( Medium time for disposal) तसेच अनुपालनाची टक्केवारी या सर्व बाबींचे विश्लेषण डॅशबोर्डवर उपलब्ध होणार आहे.

तरी सर्व नोंदणी अधिकारी यांनी प्राप्त सर्व अर्ज सेवा हमी कायदयांतर्गत निर्धारित केलेल्या कालावधीत निपटारा करण्याची दक्षता घ्यावी.

Scanned by CamScanner

हे विभागाच्या स्तरावरील सेवा हमी कायदयांन्वये सेवा वितरण कालमर्यादेचा माहिती आणि अंमलबजावणीसाठी आहे.

सही/XXX

(हिरालाल सोनवणे भा.प्र.से)

नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक,

महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

1) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक

2) सर्व सह जिल्हा निबंधक (नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांचे मार्फत)

3) सर्व दुय्यम निबंधक (सह जिल्हा निबंधक यांचे मार्फत)

4) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे

निर्गमित

नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय)

महाराष्ट्र राज्य, पुणे

क.लि. का.अ.क्र.4 नोंउपनि(संगणक)

Scanned by CamScanner